पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ४४ दिनांक २९/०८/२०२४**

# मा. पंतप्रधान,भारत सरकार,यांचे दौरा कार्यक्रमाच्या अनुषंगाने दि. ३०/०८/२०२४ रोजी सकाळी ०५:०० वाजेपासुन ते सायंकाळी १८:०० वाजेपर्यंत मनोर बोईसर बाजुकडुन पालघर शहरात येणा-या व पालघर शहरातुन जाणा-या सर्व जड-अवजड वाहनांना प्रवेश बंद

पालघर जिल्हयातील वाढवण बंदराच्या भुमिपुजनाचा कार्यक्रम शुक्रवार दिनांक ३०/०८/२०२४ रोजी सिडको मैदान,कोळगांव,ता.जि. पालघर याठिकाणी होणार असुन सदर कार्यक्रमास मा. पंतप्रधान,भारत सरकार, हे उपस्थित राहणार आहेत.

तसेच सदर कार्यक्रमाचे वेळी महत्वाचे व्यक्ती व अति महत्वाचे व्यक्ती कार्यक्रमाचे अनुषंगाने उपस्थित राहणार असुन बोईसर मार्गे तसेच मनोर मार्गे वाहनांने येण्याची शक्यता आहे. सदर दिवशी मा. पंतप्रधान,भारत सरकार, यांच्या दौरा कार्यक्रमाच्या वेळी कोणतीही वाहतुकीची समस्या निर्माण होवु नये याकरीता दिनांक ३०/०८/२०२४ रोजी बोईसर बाजुकडुन पालघर शहराकडे येणारी व पालघर बाजुकडुन बोईसर शहराकडे जाणारी तसेच मनोर बाजुकडुन पालघर शहराकडे येणा-या सर्व प्रकारच्या जड-अवजड मालवाहतुक करणा-या वाहनांना (जीवनावश्यक वाहने, पोलीस वाहने, फायर ब्रिगेड वाहने, रुग्णवाहिका, सदर कार्यक्रमाचे अनुषंगाने येणारी वाहने, प्रवासी वाहतुक करणा-या सर्व प्रकारच्या बसेस व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन) इतर सर्व जड-अवजड वाहनांना बोईसर बाजुकडुन पालघर शहराकडे येणासाठी व पालघर बाजुकडुन बोईसर शहराकडे जाण्यासाठी तसेच मनोर बाजुकडुन पालघर शहराकडे येणासाठी शुक्रवार दिनांक ३०/०८/२०२४ रोजी सकाळी ०५:०० वाजेपासुन सायंकाळी १८:०० वाजेपावेतो पुर्णतः बंदी करण्यात आलेली असुन **मा. जिल्हाधिकारी पालघर यांचेकडील जा.क्र./गृह/का.१/टे.४/ मा.पी.एम.प्रस्तावित दौरा/वाहतुक नियंत्रण अधिसुचना/एस.आर-२८/२४ दिनांक २९/०८/२०२४ अन्वये अधिसुचना जारी करण्यात आलेली आहे.**

तरी मनोर, बोईसर दिशेकडुन पालघर शहरात येणा-या व पालघर शहरातुन जाणा-या सर्व जड-अवजड वाहनांना दि.३०/०८/२०२४ रोजी सकाळी ०५:०० वा. ते सायंकाळी १८:०० वाजेपावेतो पुर्णतः प्रवेश बंदी करण्यात आलेली असुन तसेच इतर सर्व प्रकारच्या वाहनांना पर्यायी मार्गाचा अवलंब करण्याकरीता मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन वाहतुक अधिसुचना जारी करण्यात आलेली आहे.

तरी याव्दारे असे आवाहन करण्यात येते की, शुक्रवार दिनांक ३०/०८/२०२४ रोजी सकाळी ०५:०० वाजेपासुन १८:०० वाजेपावेतो कोणतेही जड-अवजड वाहन बोईसर मनोर बाजुकडुन पालघर शहरात येणार नाही. सदर अधिसुचनेचे तंतोतंत पालन करुन पोलीसांना सहकार्य करावे असे पालघर जिल्हा वाहतुक शाखेकडुन आवाहन करण्यात येत आहे.

- **इतर वाहनांसाठी वाहतुकीकरीता पर्यायी मार्ग**
  - **पालघर बाजुकडुन बोईसर बाजुकडे जाणारी वाहने** -चहाडे नाका-कोकनेर-सागावे-गुंदले गांव बाजुकडुन पुढे इच्छित स्थळी जातील.
  - **बोईसर बाजुकडुन पालघर बाजुकडे येणारी वाहने** - गुंदलेगांव-सागावे-कोकनेर-चहाडेनाका मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.